# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. महाडीबीटी-२०२२/शिष्यवृत्ती शाखा/ (३५४/२२)/ 188 दिनांक : २४.०१.२०२२

**तात्काळ / अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - महाडीबीटी पोर्टल शुल्क मंजूरीबाबतची कार्यवाही त्वरीत पूर्ण करणेबाबत...**

संदर्भ : - १. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र. महाडीबीटी पोर्टल-२०२१ / (८९२१/२१)/शिष्यवृत्ती दि. ९.१२.२०२१.

२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/ शिष्य-२०२१/ डीबीटी /७६४ दि. २१.०१.२०२२.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, सन २०२१-२२ करीता महाडीबीटी पोर्टलवरील शुल्क मंजूरीसाठी सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे कार्यालयाने संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये दि. ९.१२.२०२१ ते दि. ७.१.२०२२ या कालावधीमध्ये जिल्हानिहाय कार्यशाळा आयोजित करुन तालुकानिहाय, जिल्हानिहाय महाविद्यालयांची शुल्क मंजूर करण्यात आली. परंतु अद्यापही काही महाविद्यालयांनी संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये शुल्क मंजूरी करुन घेतली नाही तसेच अद्यापही महाडीबीटी पोर्टलवर शुल्काबाबतची माहिती भरुन मंजूरीस्तव पाठविली नाही.

**मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संदर्भिय पत्र क्र. २ नुसार सन २०२१-२२ करीता विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी दि. ३१.०१.२०२२ पर्यंत अंतिम मुदत आहे. तरी ज्या महाविद्यालयांनी महाडीबीटी पोर्टलवर अद्यापही शुल्क मंजूरी करुन घेतली नाही. त्या सर्व महाविद्यालयांनी गांभीर्याने दि. २५.०१.२०२२ पर्यंत शुल्क मंजूरी करुन घ्यावी.**

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे